0 8 JUN 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नैसर्गिक संसाधनाचे पुनर्जीवन करणे काळाची गरज

## जैवविविधतातज्ज्ञ डॉ. मनोज बोरकर : शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन वेबिनार

प्रतिनिधी
कोल्हापूर

विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधन संपत्तीची अतोनात हानी केली जात आहे. हानी रोखून नैसर्गिक संसाधनांना पुन्हा मोकळा श्वास घेऊ देणे, त्यांचे पुनर्जीवन करणे ही काळाची गरज आहे, हे ओळखून त्यादृष्टीने पाऊले टाकणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जैवविविधतातज्ज्ञ प्रा. डॉ. मनोज बोरकर यांनी शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्यावतीने 'परिसंस्थेचे पुनर्जीवीकरण' या विषयावर आयोजित ऑनलाईन वेबिनारमध्ये केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्या आवारात कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते वेलीसह झाडांचे रोपण करण्यात आले.

जागतिक पर्यावरणदिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्या आवारात कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते वेलीसह झाडांचे रोपण करण्यात आले. यानंतर आयोजित केलेल्या वेबिनारमध्ये डॉ. बोरकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी तारांतुला कोळ्यांचे परिसंस्थेतील स्थान आणि त्याच्याबाबत निर्माण झालेल्या संकटांचीही माहिती दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. माणसाने आपण वसुंधरेचे मालक नसून पृथ्वीवरील एक पाहुणा आहोत, याची पदोपदी जाणिवही ठेवणे महत्त्वाचे आहे. पर्यावरणातील प्रत्येक गोष्टीवर मालकी हक्क आहे, असे समजून त्याची हानी करणे ही कृती भविष्यासाठी निश्चित धोकादायक असणार आहे. पर्यावरणाची हानी रोखायची असेल माणसाने शाश्वत विकासाची कास धरावी लागेल. माझ्याकडून वसुंधरेवर आघात होणार नाही, यासाठीही दक्ष रहावे लागेल, अशी भावनाही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी यावेळी व्यक्त केली. पर्यावरण शास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्राजक्ता सरकाळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

0 8 JUN 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यात भूजल पुनर्भरण आवश्यक

## डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी; शिवाजी विद्यापीठातर्फे वेबिनार

कोल्हापूर, ता. ७ : राज्यातील सर्व जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात भूजल पुनर्भरण व पावसाचे पाणी संकलन करणे आवश्यक आहे, असे मत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी व्यक्त केले.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या सुवर्ण महोत्सवीवर्षानिमित्त व पर्यावरणदिनाचे औचित्य साधून भूजल सर्वेक्षण आणि विकास


डॉ. कलशेट्टी

यंत्रणा व शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागाच्या विद्यमाने आयोजित 'पाऊस पाणी संकलन व भूजल प्रदूषण' विषयावरील वेबिनारमध्ये ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे होते.

डॉ. कलशेट्टी म्हणाले, 'राज्यातील अति शोषित, शोषित पाणलोट क्षेत्रे व तेथील पाण्याच्या पातळीत घट झाली आहे. ती भरून काढण्यासाठी पाऊस, पाणी संकलन व भूजल पुनर्भरणाशिवाय पर्याय नाही. पन्नास वर्षांत भूजल उपश्यामध्ये वाढ झाली असून, भूजल पुनर्भरण, पाणलोट निहाय सध्याची भूजल स्थिती विचारात घेऊन पावले टाकावी लागतील.''

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या उपक्रमाचे कौतुक केले. वॉटर फील्ड रिसर्च फाउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक संदीप अध्यापक यांनी पाऊस पाणी संकलन व भूजल पुनर्भरण विषयावर मार्गदर्शन केले.

पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड यांनी भूजल व भूपृष्ठावरील पाणीसाठे व प्रदूषण, नागरी वस्त्यांमुळे होणारे प्रदूषण, औद्योगिकरणामुळे होणारे भूजलाचे प्रदूषण, शेतीमध्ये वापरली जाणारी रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके यामुळे होणाऱ्या प्रदुषणाची माहिती दिली. भूवैज्ञानिक ऋषिराज गोसकी यांनी स्वागत केले. भूगोल विभाग प्रमुख संभाजी शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JUN 2021
पुढारी

# उच्च, तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत आज जिल्ह्याच्या दौऱ्यावर

कोल्हापूर : राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत मंगळवारी (दि. ८) कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत. शासकीय विश्रामगृह येथील राजर्षी शाहू महाराज सभागृह येथे मंगळवार (दि.८) रोजी सकाळी १०.३० वाजता मंत्री सामंत शिवसेना पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेणार आहेत. त्याचठिकाणी सकाळी ११.१५ वाजता पीपीई किट वितरण कार्यक्रमास उपस्थित राहतील. जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी ११.३० वाजता व्हेंटिलेटर वितरण कार्यक्रमास ते उपस्थित राहणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय येथेच दुपारी १२ वाजता महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रम राबविण्याच्या अनुषंगाने आढावा बैठक होईल. दुपारी १२.३० वाजता माध्यमांशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर दुपारी १ वाजता मंत्री सामंत कोल्हापूर येथून मुंबईकडे रवाना होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUN 2021
पुढारी

# सिव्हिल इंजिनिअरिंग विषयावर ऑनलाईन वेबिनार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी शाखेत 'करिअर अपॉर्च्युनिटी इन सिव्हिल इंजिनिअरिंग' विषयावर पाच सत्रात ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या सत्रात इंजिनिअर ज्ञानेश्वर चिंचोळे यांनी स्पर्धात्मक परीक्षेची तयारी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग विषयक मार्गदर्शन केले. सहाय्यक प्राध्यापक डॉ. पी. पी. फडणीस यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सिव्हिल इंजिनियरिंग समन्वयक महेश साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. साहाय्यक प्राध्यापक एस. एम. पटवेगार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JUN 2021
पुढारी

# एम.ए., एम.एस्सी.च्या ऑनलाईन परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत सोमवारी एम.ए., एम.एस्सी., बी.एस्सी., एम.कॉम. अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने झाल्या. ६८ पैकी ६६ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. आजअखेर २८५ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. सोमवारी एम.ए.मराठी सत्र-१, एम.एस्सी.-एजीपीएम सत्र-१ या परीक्षांचा यात समावेश आहे.